
ISSN No.2394-5990

# संशोधक

वर्ष : ८५ • मार्च २०१७ • अंक १



८८-९१

# अनुक्रमणिका


१. इ.वि.का.राजवाडे यांचे धुळे येथील वास्तव्य आणि कार्य १
: प्रा. श्रीपाद नांदेडकर

२. शिर्के घराणे आणि औरंगजेब १४
: डॉ. प्रभाकर गद्रे

३. प्रकट गुह्य बोले १९
: डॉ. राहुल देशपांडे

४. किल्ले सोलापूर २७
: डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी

५. स्थानिक इतिहास–एक अध्ययन नशिराबादच्या विशेष संदर्भात ३६
: दिपक दिनकर किनगे

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुणे शहरातील पुतळा ४३
: डॉ. सोपान शेंडे

७. १९४२ चा लढा आणि सोलापूरातील कापड गिरणी कामगारांची भूमिका ४९
: नामदेव मुकुंद लवटे

८. शिवभारतातील शिवजन्म काळाचे सांकेतिक कूट – पूर्वार्ध ५३
: प्रा. रा. आ. कदम

९. मंडळवृत्त ७०


M. Su

# किल्ले सोलापूर

– डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकणी, पुणे.

मध्ययुगीन कालखंडातील अत्यंत महत्त्वपूर्ण असणारी एक वास्तू म्हणून सोलापूरचा भुईकोट किल्ला अभ्यासावाच लागतो. शहराच्या मध्यभागी असलेला हा भुईकोट 'किल्ले सोलापूर' या नावाने ओळखला जातो. हा किल्ला बहामनी साम्राज्याच्या कालखंडात बांधला गेला. या किल्ल्यांच्या बांधकामाविषयी अनेक कथा मिळतात. त्यापैकी एक कथा अशी आहे. इ.स. १३४७ मध्ये दक्षिणेत बहामनी साम्राज्य स्थापन झाले. हसनगंगू बहामनी या साम्राज्याचा संस्थापक होता. त्याने दक्षिणेतील दिल्ली सत्ताधिशांच्या ताब्यात असणारे प्रदेश जिंकून राज्यविस्तार केला. तसेच आपल्या राज्याची अधिक वाढ करण्यासाठी प्रशासकीय दृष्टीने राज्याची विभागणी प्रथम ४ भागात केली आणि नंतर ८ भागामध्ये केली. याला 'तरफ' असे म्हणत. यापैकी अहसनाबाद या भागात सोलापूरचा समावेश होऊ लागला. बहामनी सम्राट महम्मदशहा दुसरा हा इ.स. १४६३ ते १४८२ या काळात सत्तेवर होता. त्याच्याकडे महम्मद गवाण नावाचा हुशार वजीर होता. याच्या कारकीर्दीतच सोलापूरचा किल्ला बांधला गेला असावा.[१] सोलापूर किल्ल्याच्या बांधणीबाबत विविध मते मिळतात. हा किल्ला १३४५ मध्ये बांधला असे डॉ. हंटर म्हणतात. कॅम्पबेल याने हा किल्ला १३५८ ते १३७५ या काळात बांधला असे म्हटले आहे. सोलापूरचे श्री. मल्लिकार्जूनप्पा पाटील यांच्यामते १४५६ मध्ये किल्ल्याचे बांधकाम झाले असावे. या सर्व मतांवरून किल्ला बांधणी विषयीची विभिन्नता स्पष्ट होते. तथापी महम्मद गवाण याच्या काळात हा किल्ला बांधला असावा हे मत अधिक महत्त्वाचे वाटते.[२]


जेव्हा बहामनींचे अंमलदार किल्ला बांधण्यासाठी स्थळ संशोधन करीत होते तेव्हा सध्या किल्ला असलेल्या जागेवर त्यांना एक दृश्य दिसले. एक कोल्हा किल्ल्यातील मल्लिकार्जुन मंदिराच्या आसपास हिंडत होता. त्यावर अंमलदाराच्या शिकारी कुत्र्याने हल्ला चढविला. तेव्हा कोल्हा पळून न जाता शिकारी कुत्र्यावर धावून गेला व त्यालाच हद्दीबाहेर पळवून लावले. हा या जागेचा गुण आहे म्हणून बहामनींच्या



किल्ले सोलापूर

अंमलदारांनी येथेच किल्ला बांधण्याचे ठरविले. सोलापूरचा भुईकोट किल्ला ३२०x१७६ यार्ड क्षेत्रफळाचा आहे. याच्या पूर्वेकडे सिद्धेश्वर तलाव असून त्याचेच पाणी या किल्ल्यातील खंदकात खेळविलेले होते. किल्ल्याचे संपूर्ण बांधकाम मध्ययुगीन काळात झालेले होते.[३] या किल्ल्यास बाबा कादर दरवाजा, खिळ्यांचा दरवाजा, अली दरवाजा (महाकाली दरवाजा) असे ३ प्रमुख दरवाजे आहेत.[४] या किल्ल्यामध्ये जाण्यासाठी २ मोठ्या उंच दगडी स्तंभाच्या मधून जाणाऱ्या पुलावरून जावे लागते. हे स्तंभ एकमेकांपासून ४ मी. ४० सेंटीमीटर लांबीचे असून स्तंभाची गोलाई ६ मी. ५ सेंमी एवढी आहे. या दोन्ही स्तंभांना लोखंडी साखळीने बांधले जाई. स्तंभाच्या जवळपास काही फुटलेल्या, भंगलेल्या मूर्ती, खंडित वीरगळ पडलेले आहेत. यानंतर किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार लागते. बाबा कादर दरवाजा, खिळ्यांचा दरवाजा व दिल्ली दरवाजा म्हणून प्रसिद्ध असणारे हे महाद्वार संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय मजबूत असून गोमुख पद्धतीने बांधलेले आहे. शत्रूवर गरम पाणी, पेटते पलिते, अग्निबाण सोडण्यासाठी यावर जागा आहे. महाद्वाराची उंची ४ मी. ६ सेंमी. तर रुंदी १ मी. ७० सेंमी. आहे.

येथून प्रवेश केल्यानंतर बरीच मोकळी जागा दिसते. त्याला 'बुरुजसंकुल' किंवा 'बार्बीकन' असे म्हटले आहे. किल्ला बांधणीवर ग्रंथ लिहिणारे सिग्रेटॉय, एफ.यु.ए.विंटर आणि प्र.के.घाणेकर यांनी बार्बीकन या शब्दांचा वापर आपल्या ग्रंथामध्ये अनेकदा करून या जागेचे महत्त्व किल्ला बांधणीत पटवून दिले आहे. ही मोकळी जागा



किल्ले सोलापूर मुख्य प्रवेशद्वार


पहारेकऱ्यांसाठी, घोडे बांधण्यासाठी तसेच किल्ल्यातील शिबंदी एकत्र करण्यासाठी वापरले जाई.

यानंतर किल्ल्याचे दुसरे महाद्वार लागते याला 'शहर दरवाजा' किंवा 'मधला दरवाजा' असे म्हटले जाई. हे प्रवेशद्वारही दोन भव्य बुरुजांच्या मध्ये असून याचा दरवाजा लाकडी आहे व यावर उत्कृष्ट नक्षीकाम केलेले आहे. येथेही पहारेकऱ्यांसाठी जागा, माथ्याशी सज्जा आणि एक शिलालेख असून दोन्ही बाजूस दोन व्यालशिल्पे आहेत. अशी व्यालशिल्पे मध्ययुगीन कालखंडातील सर्वच किल्ल्यावर असल्याचा उल्लेख किल्लेविषयक साधनग्रंथामधून मिळतो. प्र.के.घाणेकर यांनी 'अथा तो दुर्ग जिज्ञासा' या ग्रंथात व्यालशिल्पांचा उल्लेख केलेला आहे. हा दरवाजा ३ ते ५ सेंमी उंचीचा व १ मी. ५३ सेंमी रुंदीचा आहे. येथील लाकडी दार १५ सेंमी जोडीचे आहे. संरक्षणाच्या दृष्टीने सर्व काळजी याही दरवाज्यावर घेतलेली आहे. यानंतर किल्ल्यातील दुसरे मोठे बुरूज संकुल लागते आणि तिसरे प्रवेशद्वार दिसते. तिसरे प्रवेशद्वार किल्ल्याच्या आंतरतटबंदीस असून त्यावर माथ्याशी एक शिलालेख आहे. तसेच यावर असणाऱ्या चौकोनी मोठ्या प्रशस्त दालनास किल्ल्यातील 'राजवाडा' असे संबोधले जाते. हा दरवाजा २ भल्या मोठ्या बुरुजांच्या मध्ये बांधलेला असून बुरुज

१२ मी. १० सेंमी उंचीचे आहेत. या दरवाज्यास 'अली दरवाजा' किंवा 'महाकाली दरवाजा' असे संबोधले जाते.[५] महाद्वारांसाठी लागणारा दगड किल्ल्यातील खंदकातून प्राप्त झाला असावा. ओबडधोबड काळ्या दगडी चिऱ्यांनी ही महाद्वारे बांधली गेलेली दिसतात. या महाद्वारांमध्ये जास्त कलाकुसर नसून त्यामध्ये संरक्षण व्यवस्था, अभेद्यपणा, कणखरताच जास्त दिसते. किल्ल्याच्या आतील अनेक भाग उद्ध्वस्त झाले असले तरी महाद्वारे मात्र आजही सुस्थितीमध्ये उभी असून ते गतइतिहासाची साक्ष देत आहेत.

सोलापूर किल्ल्याची तटबंदी अतिशय भक्कम असून हा दुहेरी तटबंदीचा भुईकोट किल्ला आहे. किल्ल्यास चारी बाजूने पाण्याने सदोदीत भरलेला खंदक होता. तसेच खंदकाची तटबंदी 'रेवणी' या नावाने सोलापूर शहरास लागून होती. आजही कोठे कोठे ही रेवणी दृष्टीपथात येते. या रेवणीमध्येच उत्तरेकडे 'रेवणी मारुतीचे मंदीर' आहे. किल्ल्याची बाह्यतटबंदी १६ व्या शतकातील, चारी बाजूचे चारी बुरुज व तटबंदी १४ व्या शतकातील आहे असा संदर्भ मिळतो.[६]


दोन्ही तटबंदीच्या पडकोडाचा भाग एवढा रुंद आहे की त्यावरून घोड्यावर बसून किंवा चालत सहज जाता येते. या तटबंदीचे बांधकाम एकाच कालखंडात झालेले नसून ते वेगवेगळ्या काळात झालेले दिसते.[७] तटबंदीच्या माथ्याशी त्रिकोणी कंगोरे आणि




किल्ले सोलापूर तिसरे प्रवेशद्वार

त्याला जंगेही आहेत. तटबंदीप्रमाणे सोलापूर किल्ल्याचे बुरूज अतिशय मजबूत बांधणोचे, तळाशी पसरट आणि निमूळते होत गेलेले, गोलाकार, षटकोनी, अष्टकोनी आकाराचे आहेत. अतिशय भरभक्कम असे दगडी उभे आडवे चिरे वापरून हे बांधकाम झालेले आहे. तटभिंत आणि बुरुज यांच्यावर झालेल्या लढायांच्या खाणाखुणा म्हणून लहान तोफगोळ्यांची गोलाकार छिद्रे आजही दिसतात. चौकोनी आकाराचा किल्ला असल्यामुळे तटभिंतही तशाच पद्धतीने वळलेली असून बाह्य तटबंदीवर जागोजागी अनेक शिल्पे बसविलेली दिसतात. उदा. किर्तीमुखे, राक्षसमुखे, कलमपुष्पांचे चिरे, वैष्णवांच्या प्रतिमा, द्वारपाल शिल्पे, शिखर व मंदीर प्रतिकृती, नर्तिका, यक्षयक्षिणी, हत्तीमुखे गजथरमाळा, व्यालशिल्पे इत्यादी. या शिल्पांवरून किल्ल्याच्या आसमंतात प्राचीनकाळी असलेल्या हिंदू मंदिराचे अस्तित्त्व लक्षात येते.[८]

क्षेत्रसर्वेक्षणातून किल्ले सोलापूरमध्ये अवशेषरूपाने शिल्लक असलेल्या काही इमारती आहेत. या किल्ल्यामध्ये मध्ययुगीन कालखंडात ३०० इमारती अस्तित्त्वात होत्या असे मत ग.ह.खरे यांनी मांडलेले आहे.[९] आज मात्र या किल्ल्यामध्ये मोजक्याच इमारती शिल्लक आहेत. या किल्ल्याचा दुसरा दरवाजा ओलांडल्यानंतर डाव्या हातास जी इमारत आहे. त्यास 'धान्यकोठार' असे म्हटले जाते. ही एक लांबट आणि बसकी सपाट छताची इमारत असून दर्शनी भागावर ३ मोठ्या कमानी व ३ लाकडी दरवाजे आहेत. तिसऱ्या प्रवेशद्वाराच्या माथ्याशी एक प्रशस्त मोठे दालन असून त्यावर छत नाही. या इमारतीची लांबी १४ मी. ७० सेंमी, रुंदी ८ मीटर असून, उंची ३ मीटर २५ सेंमी एवढी



तटभिंतीचे वेगवेगळे थर दाखविणारे बांधकाम




राजवाडा व धान्यकोठार

आहे. या ठिकाणी किल्लेदार रहात असावा. तसेच राज्यकर्त्यांचे मुक्काम या इमारतीत पडत असावेत. म्हणून यास 'राजवाडा' या नावाने ओळखले जाते.[१०]

या किल्ल्याचे प्राचीनत्व स्पष्ट करणारी एक इमारत उद्ध्वस्त अवस्थेत उभी असून ते 'मल्लिकार्जुन मंदीर' आहे. उत्तर चालुक्यकालीन किंवा यादवकालीन 'भूमीज' पद्धतीचे हे मंदीर असून ते उत्कृष्ट शिल्पकलेनी नटलेले आहे.

हे मंदीर खोलगट भागात आहे. कारण ते १९१७ मध्ये उत्खननाद्वारे उकरून काढलेले आहे. इ.स. १९१७ मध्ये पुराणवस्तू खात्यास या गोष्टीची कल्पना आली. त्यावेळचे सोलापूरचे कलेक्टर श्री. सिनकॉक्स यांना पहाणी करता असताना भिंतीच्या आत बुजविलेले मंदीर झरोक्यातून दिसले. इ.स. १९१९ मध्ये लॉईड जॉर्ज या गव्हर्नर जनरलच्या परवानगीचे उत्खनन करण्यात आले. तेव्हा चालुक्यकालीन हिंदू मंदिराचे अवशेष नजरेत पडले. हे मंदीर कोणी आणि केव्हा बुजवून टाकले होते याचा पुरावा मिळत नाही.[११] या मंदिराच्या भग्न अवशेषांवर शार्दुलांची रुपके, चौरसाकृती फुलांचे नक्षीकाम, मंदीर शिखर प्रतिकृती, मिथुन शिल्पे इ. नक्षीकाम आहे. खोलगट भागात हे मंदीर असल्यामुळे एखाद्या तळ्यातील नक्षीकाम केलेल्या



सोलापूर किल्ल्यातील मल्लिकार्जुन मंदीर

नौकेप्रमाणे हे मंदीर लांबून भासते.[१२] याच मंदिराचे स्तंभ घेऊन गावामध्ये मल्लीकार्जुन मंदीर बांधले गेले आहे. उद्‌ध्वस्त अवस्थेत असलेले हे मल्लिकार्जुन मंदीर १७ मी. १० सेंमी लांब व ५ मी. ८५ सेंमी रुंद आहे. या मंदिराचे खंडीत भाग किल्ल्यामध्ये जागोजागी पडलेले दिसतात.

किल्ल्यामध्ये ३२ खांबी मशीद म्हणून ओळखली जाणारी एक चांगली इमारत आजही उभी असलेली दिसते. ३२ खांबावर बांधलेली ही इमारत आहे. या ठिकाणचे स्तंभ एकाच पद्धतीचे असल्यामुळे ही इमारत किल्ला बांधणीपूर्वी अस्तित्त्वात असावी असे वाटते. ही इमारत किल्ल्यामध्ये असलेल्या मल्लिकार्जुन मंदिराच्या भक्त मंडळीसाठी बांधलेली विश्रांतिका किंवा मल्लिकार्जुन देवालयास वाहिलेले धान्य साठविण्यासाठी बांधलेले कोठार असावे असे मत सोलापूरचे प्रसिद्ध विचारवंत श्री. बाबूराव जक्कल हे म्हणतात.[१३]

ही ३२ खांबी मशीद १८ मी. २५ सेंमी., लांब आणि ७ मी. ४५ सेंमी रुंद तर उंची २ मी. ३० सेंमी आहे. या इमारतीच्या कालखंडात बांधली गेलेली आणि किल्ल्याच्या तटबंदीच्या बाहेर असलेली नागबावडी ही एक उत्कृष्ट विहीर असून ती प्रथम 'भारंगबावी' म्हणून ओळखली जाई. आज यास 'नागबावडी' असे म्हणतात.[१४] या किल्ल्यामध्ये असलेल्या मल्लिकार्जुन मंदिराची पुष्कर्णी होती. या किल्ल्यामध्ये

ब्रिटीशांनी बांधलेल्या काही इमारतीही आढळून येतात. त्यांना 'ब्रिटीशकालीन धान्यग्रह' असे संबोधले जाते. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील ही धान्यग्रहे असावीत. आजमितीला किल्ले सोलापूर येथे वरील इमारती अस्तित्त्वात आहेत. या सर्व इमारतींची माहिती किल्ल्यावर लिहिलेल्या प्रबंधातून घेतलेली आहे.[१५]

किल्ले सोलापूर येथील शिलालेखही किल्ल्याच्या इतिहासाची, तेथील बांधकामाची आणि किल्ल्याच्या दुरुस्तीची माहिती सांगतात. किल्ल्यामध्ये १० शिलालेख होते. यापैकी ६ फार्सी भाषेत, ३ मराठी व १ मोडी लिपीत आहे. हे शिलालेख येथील स्थानिक वृत्तपत्रात सविस्तर अभ्यासले गेले होते.[१६] पहिला शिलालेख पहिल्या दरवाजावर पितळी पत्र्यावर होता. इ.स. १८१० मध्ये दुसऱ्या बाजीरावांनी आबाजी बल्लाळ यांच्याकडून दरवाजा दुरुस्त करून घेतल्याची माहिती मिळते. दुसरे आणि तिसरे शिलालेख उर्दूमधील असून तेही दुसऱ्या आणि तिसऱ्या दरवाज्यावर बसविलेले होते. विजापूरच्या अली आदिलशहाच्या काळात दरवाजे बांधले गेल्याची माहिती या शिलालेखांवरून मिळते. या दहाही शिलालेखामध्ये महत्त्वाचा असलेला ७ नंबरचा शिलालेख इशान्य बाजूस असलेल्या तटभिंतीच्या एका विहीरीच्या तोंडाशी, बारा ओळीत मराठीत लिहिलेला आहे. या मूळ शिलालेखामध्ये बाळदान हा उल्लेख नसून तो हवालदार असा शब्द असल्याचे डॉ. वि.म.कुलकर्णी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण लेखात म्हटलेले आहे.[१७] या शिलालेखावर उलटसुलट चर्चा आजही होत राहते व इतिहास काळात दर्गोपाटील घराण्यातील एका स्त्रीस बळी दिल्याचा वारंवार उल्लेख केला जातो. तथापी शिलालेखात 'बाळदान' हा कोठेही उल्लेख नाही. सोलापूर किल्ल्याच्या समोरच इ.स. १८१८ ला मराठेशाहीचा ऱ्हास झाला. फेब्रुवारी १८१८ मध्ये अष्टयाची लढाई झाली. बापू गोखल्यांच्या मृत्यूनंतर दुसरे बाजीराव पेशवे या किल्ल्यात २ महिने आश्रयासाठी आले होते. बाजीराव पेशवे या किल्ल्यातून निघून गेल्यानंतर इंग्रजांनी या किल्ल्यास वेढा दिला. १० मे १८१८ रोजी किल्ल्याच्या तटास शिड्या लावून शहरात इंग्रज शिरले. मराठी सैनिक आणि इंग्रज यांच्यामध्ये घनघोर लढाई झाली. गणपतराव पानसे हे मराठ्यांचे तोफखाना अधिकारी होते तर पायदळाचे प्रमुख मेजर डी पिंटो हे होते. पानसे या युद्धात ठार झाले. १४ मे १८१८ ला इंग्रजांनी हा किल्ला जिंकला. थोडक्यात मराठेशाहीचा झालेला अस्त किल्ले सोलापूरने साश्रू नयनांनी पाहिलेला आहे.[१८]

अशारीतीने सोलापूर शहरात असलेल्या किल्ले सोलापूर या ऐतिहासिक स्मारकांची क्षेत्रसर्वेक्षणाद्वारे छायाचित्रे व रेखाचित्रे यांच्याद्वारे आणि संदर्भ ग्रंथाच्याद्वारे माहिती सादर केली आहे.

**संदर्भ :**

१) सोलापूर समाचार, ज्युबिली अंक, ६ ते ७ मार्च १९७६.
२) सोलापूर नगरपालिका शतसंवत्सरिक ग्रंथ, पृ. ४ ते ५.
३) पहा प्लेट क्र. १.
४) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, पृ. ४९७.
५) पहा प्लेट क्र. २.
६) पहा प्लेट क्र. ३
७) महाराष्ट्रातील जिल्हा सोलापूर, पृ. ११३-१४.
८) पहा प्लेट क्र. ४.
९) किल्ले नळदुर्ग आणि त्याचा परिसर प्रबंध, भाग २, डॉ. लता अकलूजकर, पृ. ५०५.
१०) पहा प्लेट क्र.५.
११) पहा प्लेट क्र. ६.
१२) पहा प्लेट क्र. ७.
१३) सोलापूर जिल्ह्यातील शिलालेख, बाबूराव जक्कल, पृ. १०२.
१४) सोलापूर समाचार, ७.३.१९७६, लेख १२, पृ. ४.
१५) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅसेटिअर -१९७०
१६) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅसेटिअर -१९७०
१७) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅसेटिअर -१९७०
१८) सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅसेटिअर -१९७०